# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.०७/०२/२०१८
## दि.०६/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ४०/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२८,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०२/१८ रोजी ०४/३० वा. कमलनाथ बिल्डींग समोर गल्ली नं.७,परम हाऊस नगर, कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ३९,२००/- रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. धोत्रे ८४२२९९५१५२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ४१/१८,भादविक ४१९,४२०,३४ |
| **फिर्यादी** | अमरितपाल गुमलेरा,वय-४१,रा.गंगा गार्डन,मुंढवा,पुणे |
| **आरोपी** | मोबाईलधारक एक इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०९/१७ ते दि.२६/०९/१७ रोजीचे दरम्यान गंगा गार्डन मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईलधारक एक इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांना फोन करुन,त्यांचे मित्रास विमानतळ,दिल्ली येथे कस्टम विभागाने पकडले असुन त्याचे ताब्यात असलेले चेक व एक मिलीयन युएसडी एवढी रक्कम त्यांना मिळुन आली आहे असे खोटे बोलुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,नमुद इसम व महिला यांचे बँकेतील खात्यावर ३,८७,८००/- रूपये फिर्यादी यांना जमा करण्यास सांगुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) एम.के.जगताप ९५५४९१७८८१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४२/१८,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | सनी अग्रवाल,वय-२८,रा.विमाननगर,पुणे |
| **आरोपी** | १.सुरज सिंग २.दोन अनोळखी इसम ३.एक अनोळखी महीला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०२/१८ रोजी २१/०० वा. ग्लायडिंग सेंटर,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व महिला यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांना युएसडी डॉलर करन्सी बदलुन देतो असे सांगुन,फिर्यादी यांचेकडुन ५ लाख रुपये घेवुन,त्या बदल्यात वर्तमानपत्राचे गुडाळलेले बंडल देवुन फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लोंढे ८९७५०२०५०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६५/१८,भादविक ३५३,३५२,४२७,५०४,५०६,(२),महाराष्ट्र पोलीस आधिनियम कलम ८५ |
| **फिर्यादी** | प्रकाश आव्हाड,पोलीस नाईक, चतुःश्रुंगी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अमीरउल्ला हबीबऊल्ला चौधरी,वय-४८,रा.आंबेगाव-बुद्रुक,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०२/२०१८ रोजी ०१/१० वा.यश रेसी.सुस रोड पाषाण,पुणे व पाषाण पोलीस चौकी, पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पोलीस नियंत्रण कक्ष पुणे यांचे आदेशावरून पाषाण सुस रोड,पुणे येथे कॉलचे पुर्तता करण्यासाठी त्यांचे सरकारी कर्तव्य बजावत असताना,यातील नमुद इसम अमीरउल्ला चौधरी याने फिर्यादीस अपशब्द वापरून त्यांचे अंगावर धावुन झटापटी करून त्यांचे वर्दीचे नुकसान केले आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी देवुन माझी वरिष्ठ अधिकारी यांच्याबरोबर ओळख आहे,तुमच्या सर्वांच्या नोक-या घालवतो असे म्हणुन फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ठेंगे ८४८३०३८९५३ |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८७/१८,भादविक ३०६,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | शिलादेवी सुग्रीवसिंग चौव्हान,वय-५२,रा.अहमदाबाद |
| **आरोपी** | एक महिला,वय-२८,रा.महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,रूम नं.१४,नागपुर चाळ,येरवडा,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१४ ते दि.२३/०१/२०१८ रोजीचे कालावधीत जम्मु-कश्मिर,कलकत्ता व हौसिंग बोर्ड, रूम नं.१४,नागपुर चाळ,येरवडा,पुणे येथे नोकरी करीत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा गोपालसिंग सुग्रीवसिंग चौहान,वय-३०,रा.महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, रूम नं.१४,नागपुर चाळ,येरवडा,पुणे याचे लग्न यातील नमुद महिला हिचेबरोबर झाल्यानंतर तीने तीचा पती गोपालसिंग चौहान यास मुल होत नसल्याचे कारणावरून त्यास फोनवर बोलु न देता,त्यास सतत टोचुन बोलुन,गोपालसिंग चौहान याचा मानसिक छळ करून,त्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.पी.लोहार ९८५०२२३१९० |

## <u>दि.०७/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ५२/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | विश्वजीत मित्रा,वय-३९,रा.खडकी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०२/२०१८ रोजी सकाळी ०७/०० ते २०/०० वा.चे दरम्यान बंगला नं.३,अर्जुन मार्ग, खडकी,पुणे येथे फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता बंगला कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे कंपाऊंडचे जाळीवरून उडी मारून त्यांचे घराचे मागील दरवाजा ढकलुन त्याची आतील लाकडी कोयंडा व चौकटीची फळी तोडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील दोन लाकडी कपाटातील कुलुप तोडुन,त्यामधील रोख रक्कम २५ हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण ६ लाख १ हजार रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.भोसले ९५०९११३११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**